# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 February 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०९ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी अकरा वाजता आठव्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. दिल्लीत भारत मंडपम इथं हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाचे थेट प्रसारण दूरदर्शन, आकाशवाणी तसंच सर्व वृत्त वाहिन्यावरून होणार आहे. हा कार्यक्रम परीक्षेतील तणावमुक्त अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देणारा तसंच विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा महत्वपूर्ण उपक्रम असल्याची प्रतिक्रीया बीड इथले शिक्षक कृष्णा जाधव आणि विद्यार्थ्यांने व्यक्त केली आहे.

> ***"प्रधानमंत्री मोदीजी नी जो कार्यक्रम हाती घेतलेला आहे 'परिक्षा पे चर्चा' यामुळं शहरी भागातील विद्यार्थ्यां बरोबरच ग्रामीण भागतील विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये न घाबरता, न कसलं प्रकारचं तणाव घेता, कसं सामोरं जावं, तसंच याचा फायदा विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक यांना सुद्धा होतो."***
>
> ***"विद्यार्थी हे फक्त विद्यार्थीच नाही. विद्यार्थी हे परीक्षार्थी नाही, तर भारताचे भविष्यातले चांगले नागरिक होणार, या दृष्टीकोनातूनच परीक्षा पे चर्चा ही मोहीम राबवली आहे. याचा फायदा आम्हासारख्या तुम्हासारख्या सर्वच विद्यार्थ्यांना होऊ शकतो."***

****

छत्तीसगढ इथं आज सकाळपासून बिजापूर–नारायणपूर सीमेवर सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये सुरू असलेल्या चकमकीत १२ नक्षलवादी ठार झाले. तसंच दोन सुरक्षा कर्मचारी शहीद तर दोन सुरक्षा कर्मचारी जखमी झाले असल्याचं बस्तरचे पोलीस महानिरीक्षक सुंदरराज यांनी सांगितलं. याबाबत मिळालेल्या माहितीच्या

आधारे शोध मोहिमेदरम्यान ही कारवाई करण्यात आली. यावेळी स्वयंचलित शस्त्रांसह अनेक शस्त्रे जप्त करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या ५२ व्या जागतिक पुस्तक मेळ्याचा आज समारोप होणार आहे. या मेळ्यात पन्नास देशातले दोन हजार प्रकाशक आणि एक हजार वक्ते सहभागी झाले होते.

****

जर्मनी इथं सुरू असलेल्या खुल्या बुद्धिबळ ग्रँड स्लॅम स्पर्धेसाठी भारताचा डी.गुकेश बाद फेरीसाठी पात्र ठरला आहे. पात्रता फेरीच्या नवव्या आणि अंतिम फेरीत नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनकडून पराभूत होऊनही गुकेशनं तीन पूर्णांक पाच गुणांसह हा टप्पा गाठला.

****

भारत आणि इंग्लंड यांच्यात एक दिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज ओडिशात कटक इथं थोड्याच वेळात सुरू होत आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेत पहिला सामना जिंकून भारत एक – शून्यने आघाडीवर आहे. हा सामनाही जिंकून विजयी आघाडी घेण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीत काल सत्तारुढ आम आदमी पार्टीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर विद्यमान मुख्यमंत्री आतिशी यांनी आज सकाळी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. सकाळी ११ वाजता त्यांनी दिल्लीचे उपराज्यपाल यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आपल्या पदाचा राजीनामा सुपूर्द केला. नव्या मुख्यमंत्र्यांची निवड होईपर्यंत त्या काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील. आतिशी यांचा मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ केवळ चार महिन्यांचा राहिला.

****

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांच्या निवासस्थानी भाजप नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक सुरू झाली आहे. दिल्ली विधानसभेत मोठा विजय मिळविल्यानंतर दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी कोणाचे नाव निश्चित करायचे यावर या बैठकीत चर्चा होणार असल्याचे समजते. भाजपाध्यक्ष जे.पी. नड्डा, दिल्ली भाजप अध्यक्ष विरेंद्र सचदेवा यांच्यासह भाजपचे अन्य काही महत्त्वाचे नेते या बैठकीला उपस्थित आहेत.

****

नवीन आयकर विधेयक या आठवड्यात संसदेत सादर करणार असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितलं. संसदेत हे विधेयक सादर केल्यानंतर ते संसदीय समितीकडे पाठविलं जाईल. संसदीय समितीनं मंजुरी दिल्यानंतर या विधेयकाला मंत्रीमंडळाची मंजुरी घेतली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. याआधीचे आयकर विधेयक सहा दशकांपूर्वी मंजूर होऊन त्याचे कायद्यात रुपांतर झाले होते. त्याची जागा आता हे आगामी विधेयक घेईल.

****

इन्शुरन्स मार्केट, पेन्शन मार्केट आणि शेअर इकॉनमी आपल्या देशाच्या आर्थिक विकासाचे तीन महत्त्वपूर्ण पैलू असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. आज नागपूर इथं 'अमृतकाल: विकसीत भारत २०४७' या गुंतवणूकदार प्रशिक्षण परिषदेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

****

नांदेड जिल्ह्यात बिलोली तालुक्यात सगरोळी इथं आज महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि संस्कृती संवर्धन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. ज्येष्ठ साहित्यिक अच्युत गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन होणार असून संमेलनाचे उद्घाटन मराठी भाषा आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष प्रमोद देशमुख यांनी दिली आहे.

****

वैद्यकीय महाविद्यालयातील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट-युजी परीक्षा येत्या ४ मे रोजी घेण्यात येणार असल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्था एनटीए नं जाहीर केलं आहे. या परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून ती ७ मार्चपर्यंत चालणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल दोन दिवसीय ४५ व्या पुष्प प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. महाराष्ट्र शासन, उपवने, उद्याने आणि सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाच्या वतीनं हे प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. प्रदर्शनाला भेट देण्याचं आवाहन विभागाचे सहायक संचालक जे.व्ही चौगुले यांनी केलं आहे.

****